# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ शहर / ५८८ /२०१६/ १९
**( नोदंणी क्रमांक २०१६०६०११४ )**

तक्रार दाखल दिनांक :- २८.०६.२०१६
निकाल दिनांक :- ०२.०८.२०१६

सौ. अर्चना अरविंद मुळे, तक्रारदार
एफ-१, प्लॉट नं.१०, एन-४ ,
सिडको, औरंगाबाद ४३१ ००१.
( ग्राहक क्रमांक ४९००१०९१०७११ )

**विरुध्द**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .शहर मंडळ -२ ,औरंगाबाद गैरअर्जदार

**उपस्थिती**

| | | |
|---|---|---|
| मंच सदस्य | १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| | २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| | ३ ) श्री. वि. सु काबरा | सदस्य |

अपिलार्थी - सौ.अर्चना अरविंद मुळे, तर्फे श्री. अरविंद कृष्णराव मुळे, रा. औरंगाबाद.
. गैरअर्जदार - श्री. बि.बि. खंडारे, कार्यकारी अभियंता, शहर विभाग-२, औरंगाबाद

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार सौ.अर्चना अरविंद मुळे, प्लॉट नं. १०, एफ-१, अजिंक्य ,सारस्वत बॅकेच्या मागे,सिडको, औरंगाबाद , ( ग्राहक क्रमांक ४९००१०४१०७११ ) यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ,नोडल ऑफीसर, शहर विभाग , महावितरण औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ अन्वये सूची अ मध्ये तक्रार दिनांक २८.०६.२०१६ रोजी दाखल केली आहे तक्रारीचा तपशिल थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

पान क्रमांक २/-

गेले सहा महिन्यापासुन विज बिल जास्त येत आहे. नोव्हेबंर २०१५ मध्ये रुपये १९७८०/- मे २०१६ ला २८८१०/- व जुन २०१६ ला रुपये ४००१०/- असे विज बिल आलेले आहे मिटर तपासणी केली तरी त्यात दोष नाही असे सांगितले . बिल कमी करुन मिळावे , मिटर बदलुन मिळावे अशी मागणी ग्राहकाने केली आहे.

**<u>कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) शहर विभाग -२ ,महावितरण, औरंगाबाद यांचे म्हणणे</u>**

गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) शहर विभाग-२ , औरंगाबाद यांनी दिनांक ०८.०७.२०१६ चे पत्रानुसार खालीलप्रमाणे आपले म्हणणे सादर केले आहे.

१ ) ग्राहकास माहे नोव्हेबंर २०१५ मध्ये २५१५९ ते २६६१६ असे एकूण १४५७ युनिटचे विज बिल देण्यात आले

२ ) ग्राहकाने दिनांक ०१.०६.२०१६ रोजी सहाय्यक अभियंता यांच्याकडे विज बिल जास्त येत असल्याची तक्रार केली होती

३ ) सहाय्यक अभियंता यांच्या दिनांक १६.०३.२०१६ च्या मिटर स्थळ तपासणी अहवालानुसार माहे मे २०१५ ते नोव्हेबंर २०१५ नुसार २२८०२ ते २६६१६ असे एकूण ३८१४ युनिटचे विज बिज ७ महिन्यात विभागुन माहे मार्च २०१६ च्या विज बिलात रुपये ३६१९.९४ वजा करुन देण्यात आले आहे.

४ ) ग्राहकाच्या अर्जानुसार माहे नोव्हेबंर २०१५ ते मे २०१६ या काळात महावितरण तर्फे जास्त विज बिलाची आकारणी करण्यात आलेली आहे अशी तक्रार ग्राहकाने संबधित शाखा कार्यालयात दिल्यानुसार दिनांक १५.०६.२०१६ रोजी ग्राहकाचे मिटर तपासले असता सदरील विज वापराचे मोजमाप योग्य प्रकारे करीत आहे. तसेच मिटर मध्ये कुठलाही दोष नाही असे कळविलेले आहे .

५ ) ग्राहकास नोव्हेबंर २०१५ ते मे २०१६ या काळात ग्राहकाने वापर केलेल्या वापराचे योग्य रिडींगचे विज बिल ग्राहकास देण्यात आलेले आहे.. तरी ग्राहकाची तक्रार नामंजूर करावी.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

१ ) ग्राहकाचे मिटर विज वापराचे मोजमाप योग्य प्रकारे करीत आहे. तसेच मिटर मध्ये कुठलाही दोष नाही.

२ ) ग्राहकास नोव्हेंबर २०१५ ते मे २०१६ या काळात ग्राहकास वापर केलेल्या विज वापराचे योग्य रिंडींगचे विज बिल देण्यात आलेले आहे.

३ ) ग्राहकाचे समाधानासाठी त्यांचे मिटर बदलून देणे आवश्यक आहे त्याचा सर्व खर्च ग्राहकाकडून घेण्यात यावा.

वरील सर्व बाबीचा विचार करता मंच खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१ ) ग्राहकाची तक्रार अशंत: अमान्य करण्यात येत आहे.

२ ) ग्राहकास महावितरणने दिलेले विज बिल योग्य असल्याने ती बिले ग्राहकाने नियमितपणे भरावित.

३ ) महावितरणने ग्राहकास जुने मिटर बदलून नविन मिटर बसवावे व त्यासाठी येणारा खर्च ग्राहकाकडून वसूल करावा

४ ) ३० दिवसाचे आत आदेशावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |